पिंपरी चिंचवड सायन्स पार्क

निविदा सूचना क्र. ०३/२०२५-२६

खालील नमुद केलेल्या कामाकरिता २४ महिने (२ वर्षे) कालावधीसाठी पिंपरी चिंचवड सायन्स पार्कसाठी टेंडरिंग सुविधे अंतर्गत योग्य त्या वर्गात पंजीकृत असलेल्या ठेकेदाराकडून प्रतिशत दराची निविदा बी-१ पद्धतीने मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रुपये | बयाणा रक्कम रुपये (१%) | अनामत रक्कम रुपये (५%) | फॉर्म फी रक्कम रुपये (परत न मिळणारी) | कामाची मुदत (महिने) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| जागा/ दुकान भाड्याने देणे | | | | | | |
| १ | पिंपरी चिंचवड सायन्स पार्क परिसरामध्ये विज्ञान खेळणी दुकान भाड्याने देणे | प्रति महा किमान दर - र.रु. ३,५००/- | -- | ३,५००/- | १००/- | २४ |

सदर निविदेतील नियम व अटी इत्यादींची माहिती पिंपरी चिंचवड सायन्स पार्कच्या www.pcsciencepart.org या वेबसाईटवर उपलब्ध राहिल. सदर निविदा मनपाच्या बी-१ पद्धतीने भरावयाची आहे.

ज्या निविदाधारकांना शासकीय, निमशासकीय, कंपनी अस्थापना, मल्टीप्लेक्स, मॉल्स इ. मधील अशा स्वरुपाच्या कामाचा अनुभव आहे. त्यांनाच निविदा भरता येईल व अनुभवाचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील. निविदेमध्ये कोणताही बदल झालेस वेबसाईटवरुन प्रसिद्ध करणेत येईल. याबाबत कोणतीही माहिती आवश्यक असलेस मुख्य कार्यकारी अधिकारी, पिं.चिं.सायन्स पार्क - ७७४४९४४३३३ यांचेशी संपर्क साधावा. कोणतेही कारण न देता निविदा पूर्णतः किंवा अंशतः नामंजूर करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पिं.चिं.सा.पा. यांनी राखून ठेवला आहे.

फॉर्म विक्री दि. १७/०४/२०२५ ते २६/०४/२०२५ व निविदा सादर करणेचा अंतिम दिनांक २७/०४/२०२५ दु. ३.०० पर्यंत राहिल. फॉर्मसाठी वेबसाईटवर लिंक पुरविण्यात येईल व निविदा सायन्स पार्क कार्यालयात सादर करावी.

सही/-

मुख्य कार्यकारी अधिकारी

पिंपरी चिंचवड सायन्स पार्क

पिंपरी चिंचवड सायन्स पार्क

सुव्हेनिअर शॉप (विज्ञान खेळणी दुकान) भाडेतत्वावर चालविण्यास देणे

अटी शर्ती

१) पिंपरी चिंचवड सायन्स पार्क इमारती मध्ये दर्शनी भागात असलेले १० X ७ फूट आकाराचे सुव्हेनिअर शॉप (विज्ञान खेळणी दुकान) प्रतीमाह किमान भाडे र.रु. ३,५००/- प्रमाणे भाडेतत्वावर करारनामा करुन चालविण्यास देणे आहे.

२) किमान दरापेक्षा कमी दराच्या निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.

३) सदरच्या शॉपमध्ये असलेल्या फर्निचर सह शॉप चालविण्यास देण्यात येत आहे.

४) सदरचे दुकान मुख्य कार्यकारी अधिकारी पिंपरी चिंचवड सायन्स पार्क यांनी निर्धारीत केलेल्या जागेमध्येच चालविण्याचे आहे.

५) सदर दुकानासाठी वीज सायन्स पार्क तर्फे सबमीटर द्वारे वीज उपलब्ध करुन देण्यात येईल तथापी वीज आकार सायन्स पार्क तर्फे देण्यात आलेल्या MSEDCL च्या बील गणकानुसार असेल.

६) सदर दुकान चालविणे कामी आवश्यक ते शासने सर्व प्रकारचे परवाने दुकान चालकाकडे असणे आवश्यक आहे.

७) दुकानासाठी अग्निशमन यंत्रणा दुकानदाराने स्वखर्चाने स्थापित करावयाची आहे.

८) दर महिन्याच्या पाच तारखेच्या आत निर्धारित केलेले भाडे व वीज आकार पिंपरी चिंचवड सायन्स पार्क कार्यालयाकडे जमा करावयाचा आहे.

९) सुव्हेनिअर शॉर काही कारणाने दुकान चालकाकडून बंद केले गेल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व त्यास काळ्या यादीत टाकण्यात येईल.

१०) दुकानामध्ये बाल मजूर कामगार काम करणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

११) दुकानामध्ये विक्री करताना वस्तुंची MRP (अधिकतम विक्री किंमत) पेक्षा जास्त दराने विक्री करता येणार नाही.

१२) दुकानातील व परिसरातील साफसफाई व स्वच्छतेची जबाबदारीची दुकान चालकाची असेल.

१३) दुकान चालविणे संदर्भात शासनाचे व मनपाचे वेळोवेळी लागु होणारे नियम व अटी - शर्ती या दुकान चालकास बंधनकारक राहतील.

१४) मूळ निविदेच्या अटी, शर्ती या करारनाम्याच्या अविभाज्य भाग राहील.

१५) कोणतेही कारण न देता पूर्णतः अथवा अंशतः दुकान चालविणे कामी प्रस्ताव नामंजूर करणेचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पिं.चिं.सा.पा. यांनी राखुन ठेवला आहे.

१६) टेंडरिंग द्वारे दि. १७/०४/२०२५ ते दि. २७/०४/२०२५ या वेळेत दु. ३.०० पर्यंत स्विकारलेले फॉर्म प्रसिद्ध केलेल्या वेळेमध्ये कार्यकारी समिती, पिंपरी चिंचवड सायन्स पार्क यांचे समोर उघडण्यात येतील. प्रस्तावाचे लिफेफे उघडण्याची वेळ व दिनांक ई-मेल व दुरध्वनी संदेशाद्वारे कळविण्यात येईल. प्रस्तावाची पाकीटे उघडण्यासाठी दुकान चालकांनी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील.

१७) दुकान चालविणे कामी ठेका २ वर्षे कालावधीसाठी राहील. ठेका संपल्यानंतर दुकानातील सर्व साहित्य आठ दिवसाच्या आत घेऊन जाणे बंधनकारक राहील.

१८) र.रु. ३,५००/- अनामत म्हणून ठेवणे बंधनकारक आहे.

उपरोक्त अटी व शर्ती विज्ञान खेळणी दुकान चालकास बंधनकारक राहतील. त्यामुळे वरील अटी - शर्ती व कायद्यातील तरतूदींचा भंग केल्यास ठेका रद्द केला जाईल.

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
पिंपरी चिंचवड सायन्स पार्क

**पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड, पुणे - ४११०१९**

निविदा सुचना क्रमांक ०३/२०२५-२६

प्रपत्र अ (पाकिट क्र. १)

---------------------------------------------------------------------------------------

ठेकेदाराने भरावयाचे विवरण

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव<br>Company/ Person Name | |
| २ | स्थापना दिनांक<br>Date of Incorporation | |
| ३ | संस्था कार्यालयाचा पत्ता<br>Company Head Office Address | |
| ४ | फोन नं<br>Contact No. | |
| ५ | ई-मेल<br>E-mail | |
| ६ | संस्था नोंदणी क्र. व तारीख<br>Shop & Establishment Registration No. & Date | |
| ७ | पॅन क्र.<br>Permanent Account No. | |

वरील क्रमांक ६ व ९ ची कागदपत्रे सोबत जोडली आहे.

**पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड, पुणे - ४११०१९**

निविदा सुचना क्रमांक ०३/२०२५-२६

**'प्रपत्र ब'** (पाकिट क्र. २)        निविदा फॉर्म क्र.

---------------------------------------------------------------------------------------------

निविदा फॉर्म - 'प्रपत्र ब' ठेकेदाराने द्यावयांच्या दराचे पत्रक        निविदा फॉर्म र.रु. १००/-

१) निविदा भरणा-या व्यक्तीचे/ ठेकेदाराचे नाव- ________________________________

२) उपलब्ध असल्यास नोंदणी क्र.        - ________________________________

३) पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता        - ________________________________

४) ई-मेल आयडी        - ________________________________

पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड, पुणे - ४११०१९ यांचे सुव्हेनिअर शॉप (विज्ञान खेळणी दुकान) भाडेतत्वावर चालविण्यास देणे कामी मान्यता प्राप्त निविदाधारकांकडून निविदा मागविणेत येत आहेत. या कामासाठी मी/ आम्ही खालील नमुद केलेल्या दरानुसार चालविण्यास तयार आहे. सदरचे दर हे सर्व करांसह आहेत. सदरचे कामासाठी असलेले पिंपरी चिंचवड सायन्स पार्कच्या नियम/ अटी व शर्ती मी/ आम्ही वाचल्या असून त्या मला/ आम्हाला मान्य आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | प्रतीमाह किमान भाडे र.रु. | प्रतीमाह कालावधीसाठीचे ठेकेदाराचे दर (आकड्यामध्ये व अक्षरी) |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड, पुणे -१९ यांचे सुव्हेनिअर शॉप (विज्ञान खेळणी दुकान) भाडेतत्वावर चालविण्यास देणे. | ३,५००/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा __________% कमी/ जास्त अक्षरी ____________ टक्के कमी/ जास्त |

वरीलप्रमाणे पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड, पुणे - १९ यांचे सुव्हेनिअर शॉप (विज्ञान खेळणी दुकान) भाडेतत्वावर चालविण्यास देणे कामी वरीलप्रमाणे दर देण्यात आलेले आहेत. ते माझेवर/ आमचेवर बंधनकारक आहे. त्यासाठी मी/ आम्ही निविदाकार म्हणून खालीलप्रमाणे स्वाक्षरी करीत आहे/ आहोत.

ठेकेदाराची सही-

शिक्का        -

नाव व पत्ता    -

दि.        -